# निशाणी १ वरील आदेश

(दिनांक ०४.०५.२०२६)

प्रस्तुतचा अर्ज वारस प्रमाणपत्र देण्यासाठी मुंबई रेगुलेशन–८, १८२७ चे नियम २ अंतर्गत दाखल केला आहे.

२. **अर्ज सादर करण्यामागील बाबी खालीलप्रमाणे आहेतः**

श्रीकृष्ण हरिभाऊ धर्माळ यांचे निधन दिनांक ०८.०१.२००९ रोजी मौजे पातुर्डा बु., ता. संग्रामपुर, जि. बुलडाणा येथे झाले आहे. तसेच, मयत श्रीकृष्ण हरिभाऊ धर्माळ यांची आई नामे रुख्माबाई हरिभाऊ धर्माळ ह्या दिनांक १२.०१.२०१० रोजी मौजे पातुर्डा बु., ता. संग्रामपुर, जि. बुलडाणा येथे मयत झाल्या आहेत.

३. श्रीकृष्ण हरिभाऊ धर्माळ यांचे अर्जदार क्र. १ पत्नी, अर्जदार क्र. २ व ३ मुली आहेत. अर्जदारांस शासकीय व निमशासकीय कामकाजासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यक्ता आहे.

४. त्याकरीता अर्जाच्या समर्थनार्थ अर्जदार क्र. १ यांनी प्रतिज्ञालेख (नि.क्र. १७) दाखल केला आहे. याव्यतिरिक्त, अर्जदारांनी पुराव्यामध्ये मयत श्रीकृष्ण हरिभाऊ धर्माळ व रुख्माबाई हरिभाऊ धर्माळ यांचे मृत्यू प्रमाणपत्र (नि.क्र. १८ व १९) व अर्जदारांच्या ओळखपत्राची सत्यापीत प्रती (नि.क्र. २० ते २२), रेशनकार्ड (नि.क्र. २३) व वारसाचा दाखला (नि.क्र. २४) यावर भिस्त ठेवली आहे.

५. वृत्तपत्र जाहीरनामा (नि.क्र. २५) देऊन देखील अर्जामधील कथनावर आक्षेप नोंदविण्याकरीता कुणीही हजर झाले नाही. करीता अर्जदारांचे कथन नाकारण्याचे कुठलेही कारण दिसुन येत नाही. या सर्व बाबींचा विचार करता, मृतांचे कायदेशीर वारस म्हणून त्यांच्या नावावर अधिकृत कामे पार पाडण्यासाठी अर्जदारांच्या बाजूने वारस प्रमाणपत्र देणे न्यायोचित ठरेल. करीता मी पुढील आदेश पारीत करीत आहे :

# आदेश

**अ]** अर्ज मंजुर करण्यात येतो.

**ब]** नियमांनुसार आवश्यक कोर्ट–फी भरल्यानंतर अर्जदार

१. शोभा श्रीकृष्ण धर्माळ, वय ५३ वर्ष,
रा. पातुर्डा बु., ता. संग्रामपुर, जि. बुलडाणा

२. वर्षा नितीन इंगळे, वय २७ वर्ष,
रा. जळका भडंग, ता. खामगांव, जि. बुलडाणा

३. माधुरी कपीलकुमार ढोने, वय २५ वर्ष,
रा. शिवाजी नगर, पातुर, ता. पातुर, जि. अकोला

यांच्या नावे मृत –

**श्रीकृष्ण हरिभाऊ धर्माळ**

यांचे कायदेशीर वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यात यावे.

**क]** अर्जदारास या प्रमाणपत्रानुसार मिळालेल्या सर्व मालमत्ता इत्यादी नोंदी किंवा मालमत्तेची कशी विल्हेवाट केली याबाबतची संपुर्ण यादी, हिशोब न्यायालयाकडे ६ महिन्यांच्या आत सादर करण्याचे आदेशीत करण्यात येते. त्याबाबतची नोंद सिव्हील मॅन्युअलच्या अध्याय चौदा पॅरा ३१२ मध्ये असलेल्या तरतुदींनुसार प्रमाणपत्रात घेण्यात यावी.

**ड]** वारस प्रमाणपत्र केवळ मृताच्या मालमत्तेच्या कायदेशीर व्यवस्थापना संबधी अधिकृत वापरासाठी आहे. त्याचा वापर मालमत्ता हस्तांतरण करण्यासाठी असणार नाही.

SWAPNIL LILADHAR RAMTEKE
Digitally signed by SWAPNIL LILADHAR RAMTEKE
Date: 2026.05.04 17:12:27 +0530

(स्वप्नील लि. रामटेके)

दिनांक : ०४.०५.२०२६

**दिवाणी न्यायाधीश क. स्तर, संग्रामपुर**

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पीडीएफ फाईल मधील मजकूर हा मुळ न्यायानिर्णयाप्रमाणे शब्द न शब्द जशास तसा व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – एस. जी. जैन

कार्यालयाचे नाव – न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, संग्रामपुर.

लघुलेखक